**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महिलांना आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लखपती दिदी संमेलनात ग्वाही.**
2. **सुदृढ आरोग्यासाठी मुलांना पोषणयुक्त आहार मिळणं आपली प्राथमिकता असल्याचं पंतप्रधानांचं 'मन कि बात' मधून प्रतिपादन.**
3. **'नैसर्गिक शेती' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नागपुरात संपन्न; शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळण्याचं गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचं आवाहन.**
4. **संततधार पावसामुळे अमरावती जिल्ह्यातल्या ५६ प्रकल्पांच्या जलसाठ्यांत वाढ; अप्पर वर्धा धरणातून विसर्ग सुरू.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी

देशाला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्याच्या वाटचालीत महिलांचा मोठा वाटा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. जळगाव मध्ये आज झालेल्या लखपती दिदी संमेलनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज देशभरातल्या ११ लाख नव्या लखपती दीदींना, प्रतिकात्मक स्वरुपात प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव केला गेला, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या दहा वर्षांत १ कोटी लखपती दीदी झाल्या आहेत, तर गेल्या दोन महिन्यात त्यात आणखी ११ लाख लखपती दीदींची भर पडल्याची माहिती पंतप्रधानांनी यावेळी दिली. मागील काही महिन्यांत महाराष्ट्रातील एक लाख महिला लखपती झाल्याचंही मोदी यांनी यावेळी सांगितलं. महिला सशक्तीकरणासाठी आपलं सरकार ठोस निर्णय घेत असून प्रधानमंत्री आवास योजना, नारी शक्ती वंदन सारख्या अभियानामार्फत महिलांना आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याचं काम केलं गेलं आहे असं मोदी म्हणाले. पंतप्रधानांच्या हस्ते दोन हजार पाचशे कोटी रुपयांचा 'सामुदायिक गुंतवणूक पुनरावर्ती निधी' यावेळी जारी करण्यात आला. या फिरत्या निधीचा फायदा २ लाख ३५ हजार चारशे स्वयंसहाय्यता गटांच्या सुमारे २५ लाख ८० हजार सदस्यांना मिळणार आहे. ३४ राज्यांमधल्या सुमारे ३० हजार ठिकाणांहून या कार्यक्रमात लखपती दीदी दूरदृष्यप्रणाली द्वारे सहभागी झाल्या होत्या. राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यक्रमाला उपस्थित होते. दरम्यान, नेपाळ दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुबांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत दिली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली.

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे देशवासियांशी संवाद साधला. देशाने साध्य केलेल्या यशाबद्दल आणि देशातील जनतेच्या सामुहीक प्रयत्नांबद्दल बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्या राष्ट्रीय अंतराळ दिनाचा उल्लेख करीत चंद्रयान-3 चा उल्लेख केला. अंतराळ क्षेत्राशी संबंधित स्पेस टेक स्टार्ट अप-गॅलेक्स आयच्या चमूशी पंतप्रधानांनी संवाद साधला. सामूहिक राजकीय पार्श्वभूमी नसलेले युवक राजकारणात पुढे येऊ शकतील. त्यांचा अनुभव आणि त्यांचा उत्साह देशाच्या उपयोगी पडेल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. या अभियानात स्वतःला जोडून घेण्याचं आवाहन त्यांनी युवकांना केलं. प्रत्येक घरी तिरंगा आणि संपूर्ण देशात तिरंगा या अभियानाच्या यशाचा त्यांनी उल्लेख केला. मनुष्य आणि वन्य प्राणी संबंधांवरही त्यांनी उदाहरण देत भाष्य केलं. मध्यप्रदेशच्या झाबुआ जिल्ह्यातील कचरा व्यवस्थापनाचं त्यांनी कौतुक केलं. स्टार्ट अपच्या माध्यमातून पर्यावरण रक्षण करण्यावर त्यांनी भर दिला. अनेक देशांमध्ये संस्कृत भाषेशी संबंधित संशोधन आणि प्रयोग होत असल्याचे सांगून त्यांनी 'संस्कृत ऑन दि रिव्हर्स' उपक्रमाची माहिती दिली. 'एक पेड मा के नाम' या अभियानात सहभागी होऊन वृक्षारोपण करण्याचं आवाहन त्यांनी मन की बात मधून केलं. आरोग्य संपन्न राहण्यासाठी योगासने, सुपर फूडचा आहारात समावेश करण्यासह मुलांच्या सुदृढ आरोग्यासाठी त्यांना पोषणयुक्त आहार मिळणं ही आपली प्राथमिकता असल्याचं पंतप्रधान म्हणाले. देशभरात संपूर्ण सप्टेंबर महिना पोषण महिना म्हणून साजरा केला जातो, असं पंतप्रधानांनी नमूद केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना आगामी सणांच्या आणि पॅरिसमध्ये पॅरोऑलिम्पिक्समध्ये सहभागी दिव्यांग क्रीडापटुना शुभेच्छा दिल्या. मन की बात कार्यक्रमाचा हा ११३ वा भाग होता.

## कृषी महोत्सव

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ इथं राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं दिनांक २१ ते २५ऑगस्ट दरम्यान आयोजन करण्यात आलं आहे. मात्र, कृषी महोत्सवास राज्यातील शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या प्रदर्शनाचा कालावधी एक दिवस वाढवण्यात येत असून, या महोत्सवाचा समारोप उद्या करण्यात येईल असं कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितलं आहे.

## लाडकी बहीण

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ज्या महिलांनी ३१ जुलै नंतर अर्ज केला आहे, त्या अर्जांची पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र महिलांना लाभ मिळणार असल्याचं महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं. आतापर्यंत राज्यभरातून या योजनेसाठी २ कोटी ६ लाख १४ हजार ९९० अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी १ कोटी ४७ लाख ४२ हजार ४७६ अर्ज पात्र ठरले आहेत. तर ४२ हजार ८२३ अर्जांची पडताळणी सुरू आहे.

## युनिफाईड पेन्शन स्कीम

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रीमंडळानं काल UPS अर्थात एकात्मिक निवृत्तीवेतन योजनेला मंजुरी दिली.NPS अर्थात नवीन निवृत्ती वेतन योजनेच्या अंतर्गत असलेल्या केंद्र सरकारच्या २३ लाख अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना याचा लाभ होईल. राज्य सरकारचे अधिकारी-कर्मचारी यात सहभागी झाले तर ही संख्या ९० लाखांनी वाढेल, अशी माहिती माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वार्ताहर परिषदेत दिली. या योजनेअंतर्गत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शेवटच्या १२ महिन्यांच्या वेतनाच्या निम्म्या वेतनाइतकी रक्कम निवृत्तीवेतन म्हणून मिळेल. मात्र यासाठी त्यांना किमान २५ वर्ष सेवेत रहावं लागेल. किमान १० वर्ष सेवा केलेल्यांना किमान १० हजार रुपये निवृत्तीवेतन दिलं जाईल. या सर्व रकमेवर महागाई भत्ताही दिला जाईल, असं वैष्णव म्हणाले.

## मंकी पॉक्स

मंकी पॉक्स विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाकडून पुणे जिल्ह्यात प्रतिबंधात्मक उपाय राबवण्यात येत आहेत. सिंगापूर आणि दुबई इथून आलेल्या ५३१ प्रवाशांची तपासणी पुणे विमानतळावर गेल्या सहा दिवसांत करण्यात आली. यात एकही संशयित रुग्ण आढळला नाही. मात्र खबरदारीचा उपाय म्हणून या प्रवाशांची तपासणी केल्याचं आरोग्य विभागानं सांगितलं आहे.

## ॲग्रोव्हिजन

वाडवडिलांकडून मिळालेल्या उपजाऊ शेतीमध्ये युरिया, डीएपी, किटकनाशकांचा अतिरिक्त वापर केल्यामुळे शेती नापीक झाली असून आजारांचे प्रमाण वाढले आहे. शेतीला परत एकदा उपजाऊ करायचं असेल, अधिक उत्पादन, अधिक नफा प्राप्त करायचा असेल आणि आजारापासून दूर राहायचं असेल तर शेतक-यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावं, असं आवाहन गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज केलं. ॲग्रोव्हिजन फाउंडेशनतर्फे आचार्य देवव्रत लिखित हिंदी पुस्तकाच्या ‘नैसर्गिक शेती’ या मराठी अनुवादाचा प्रकाशन सोहळा आज नागपूर इथं पार पडला. शेतकरी आत्महत्येसारख्या गंभीर प्रश्नाने ग्रासलेल्या विदर्भात जास्तीत जास्त प्रमाणात नैसर्गिक शेतीचा अवलंब करायला हवा. नैसर्गिक शेतीमध्ये आत्महत्या रोखण्याची क्षमता आहे, असा विश्वास देवव्रत यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ॲग्रोव्हिजन शेतकरी प्रशिक्षण केंद्राचं आभासी पद्धतीने भूमिपूजन करण्यात आलं. यावेळी संबोधन करताना 'शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान अवगत व्हावे तसेच योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी नागपूरमध्ये दरवर्षी ॲग्रोव्हिजनच्या माध्यमातून आपण कृषी प्रदर्शनाचे आयोजन करतो. यालाच जोड म्हणून कायमस्वरूपी 'ॲग्रोव्हिजन शेतकरी प्रशिक्षण केंद्र' नागपूरमधील वर्धा रोडवर तयार होत आहे' असं गडकरी यांनी सांगितलं. या प्रशिक्षण

केंद्रात प्रशिक्षण सभागृह, कॉटन टेस्टिंग लॅब, भाजीपाला विक्रीसाठी आठवडा बाजार असणार आहे. याशिवाय येथे वर्षभर शेतीविषयक प्रशिक्षण आणि प्रकल्प राबवले जातील.

## अमरावती अपघात

गायीला वाचविण्याच्या प्रयत्नात नागपूर वरून अकोल्याकडे जाणाऱ्या शिवशाही बसचा भीषण अपघात झाल्याची घटना आज सकाळी ९ वाजताच्या दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर घडली. या घटनेत दोन जण ठार झाले असून २८ प्रवासी जखमी असल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेनंतर महामार्गावर काही तास वाहतूक विस्कळीत झाली होती. नांदगाव पेठ पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न करून अनेकांचे प्राण वाचवले. जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

वाशीम जिल्ह्यातील रिसोड शहरा नजीकच्या मुंगसाजी नगर येथील एका 13 वर्षीय अल्पवयीन मुलीचं अपहरण करून तिच्यावर तिघांनी अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या घटनेतील तीन आरोपींना रिसोड पोलिसांनी अटक केली आहे.

## हवामान

आगामी काही तासांत विदर्भातील तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तविली आहे. बुलढाणा, अकोला, अमरावती आणि वाशीम जिल्ह्यांत उद्या सर्वत्र पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली वगळता उद्या सर्वत्र पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मागील २४ तासांत ब्रह्मपुरी इथं ८८ पूर्णांक ८ दशांश मिलीमीटर इतक्या पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, अमरावती जिल्ह्यात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे मोठ्या, मध्यम आणि लघु अशा ५६ प्रकल्पांच्या जल साठ्यात वाढ झाली असून, यातील काही प्रकल्पाची दारे उघडण्यात आली आहे. अप्पर वर्धा धरणाचे ११ दरवाजे ४०सें.मी.ने उघडून त्यातून ६९६ क्युसेकने विसर्ग होत आहे.

****